महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादीत

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादीत

एस्ट्रेला बॅटरीज एक्सपॅन्शन इमारत,तळमजला,लेबर कॅम्प,
धारावी रोड, माटुंगा (पुर्व) मुंबई -४०० ०१९
दुरध्वनी क्र. ०२२-६९४२५००
ई-मेल agmhrc@mahagenco.in वेबसाईट :- www.mahagenco.in

---

क्र.महानिर्मिती/जा.क्र.०३-२०२५/ No 01190 दिनांक: 10 FEB 2026

## सूचना

**विषय :-** जाहिरात क्र.०३/२०२५ अन्वये कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) या पदाच्या पार पडलेल्या शारीरिक क्षमता चाचणी (PET) आणि मनोविश्लेषणात्मक चाचणीअंती (Psychometric Test) कागदपत्रे पडताळणीसाठी, ती जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांबाबत.

**संदर्भ:-** १) महानिर्मिती जाहिरात क्र.०३/२०२५
२) महानिर्मिती सूचना क्र.५०१४ दि.०५.०६.२०२५
३) महानिर्मिती सूचना क्र.७२०४ दि.१२.०८.२०२५
४) महानिर्मिती सूचना क्र.७८४९ दि.०२.०९.२०२५
५) महानिर्मिती सूचना क्र.७९६४ दि.०९.०९.२०२५
६) महानिर्मिती सूचना क्र.८२२४ दि.१६.०९.२०२५
७) महानिर्मिती सूचना क्र.८८२४ दि.०१.१०.२०२५
८) महानिर्मिती सूचना क्र.८८६ दि.३०.०१.२०२६

---

महानिर्मिती कंपनीतर्फे "कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा)" यांची पदे सरळसेवा प्रवेशाव्दारे भरण्याकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरील जाहिरातीच्या अनुषंगाने दि.०५.०७.२०२५ रोजी "कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा)" या पदाची ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली होती. तदनंतर संदर्भिय क्र.०३ अन्वये ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुणांच्या अनुषंगाने १:२० या प्रमाणात पात्र उमेदवारांची शारीरिक क्षमता चाचणी (PET) आणि मनोविश्लेषणात्मक चाचणी (Psychometric Test) सातारा व बुलढाणा या केंद्रावर पार पाडण्यात आल्या आहेत.

उपरोक्त ऑनलाईन परीक्षा आणि शारीरिक क्षमता (PET) व मनोविश्लेषणात्मक (Psychometric) चाचणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांना प्राप्त गुणांच्या आधारे, कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता १:२ या प्रमाणात पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी सोबत जोडली आहे. तसेच महानिर्मिती कंपनीतर्गत पहारेकरी (Watchman) / सुरक्षा रक्षक (Security Guards) म्हणून कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी राखीव असलेल्या पदांसमोर अर्ज सादर केलेल्या आणि शारीरिक क्षमता (PET) व मनोविश्लेषणात्मक (Psychometric) चाचणीअंती पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी बोलविण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे कागदपत्रे पडताळणीसाठी, ती जमा करण्याच्या प्रक्रियेस, पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी प्राप्त करुन घेण्यासाठी उमेदवारांनी खालील ठिकाणी ↵ क्लिक करावे.

**"कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) पदाची यादी"** ↵

**"कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा)-महानिर्मिती कंपनीतील पहारेकरी / सुरक्षा रक्षक यांच्यासाठी राखीव पदांची यादी"** ↵

* वरील यादीत उमेदवारांच्या नावाचा अनुक्रम हा त्यांना ऑनलाईन परीक्षा आणि शारीरिक क्षमता (PET) व मनोविश्लेषणात्मक (Psychometric) चाचणीत प्राप्त गुणांच्या अनुषंगाने नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

उमेदवारांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त यादी ही ऑनलाईन परीक्षा आणि शारीरिक क्षमता (PET) व मनोविश्लेषणात्मक (Psychometric) चाचणीत उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणांनुसार तसेच जाहिरातीत देण्यात आलेल्या रिक्त पदांची उपलब्ध संख्या व समांतर आणि सामाजिक आरक्षण विचारात घेवून तयार करण्यात आलेली आहे. ऑनलाईन परीक्षेसह शारीरिक क्षमता (PET) आणि मनोविश्लेषणात्मक (Psychometric) चाचणी करीता उपस्थित उमेदवारांचे गुण अंतिम निवड यादीसोबत प्रसिध्द करण्यात येतील.

कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेस पात्र ठरलेल्या उमेदवारांनी, कागदपत्रे जमा करणेकरीता खालील अटी व शर्तींची पुर्तता करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी असेल याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१) उपरोक्त यादी ही, कोणतीही निवड अथवा प्रतिक्षा यादी नाही, याची उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

२) वरील यादीतील सर्व उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक अर्हता, वय,जात,उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, महिला आरक्षण, माजी सैनिक व अनाथ व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र इत्यादी बाबतचे मूळ प्रमाणपत्रे ही कागदपत्रे जमा करतेवळी सादर करणे बंधनकारक राहील व ती सादर करु न शकल्यास उमेदवाराची निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

३) उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेकरीता कोणत्याही प्रकारची कागदपत्रे पडताळणी / छाननी न करता बोलविण्यात आले होते. त्यानुसार आता, उमेदवारांनी सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता,वय,जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, माजी सैनिक,महिला आरक्षण व अनाथ व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र इत्यादी बाबतचे मुळ प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात येईल.

४) मागास प्रवर्गातील तसेच समांतर आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांनी महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) सध्याच्या कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेदरम्यान सादर करणे बंधनकारक राहील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

५) ज्या उमेदवारांनी विजा-अ,इ.मा.व.,सा.व.शै.मा.वर्ग, भज-क, भज-ड व वि.मा.प्र या सामाजिक प्रवर्गातून आणि "आदुघ" प्रवर्गातून अर्ज सादर केला आहे, अशा उमेदवारांनी त्यांना लागू असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे वैध प्रमाणपत्र तसेच "आदुघ" प्रवर्गाकरीता लागू असलेले मिळकतपत्र (Income Certificate) संबंधीत सक्षम अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन दि.०८.०४.२०२५ पर्यंत वैध असलेले अथवा सध्याच्या कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी म्हणजेच दि.१८.०२.२०२६ रोजी पर्यंत प्राप्त केलेले व वैध असणे आवश्यक आहे.

६) मागास प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या ज्या महिला उमेदवारांची कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता निवड ही खुला प्रवर्ग महिला आरक्षणातंर्गत (WR) / संबंधित मागास प्रवर्गातून झाली आहे (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती हे प्रवर्ग वगळून) अशा उमेदवारांनी संबंधित प्रवर्गातून महिला आरक्षणाकरीता लागू असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र, जाहिरातीच्या अंतिम दिनांकापूर्वी (दि.०८.०४.२०२५) अथवा सध्याच्या कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी म्हणजेच दि.१८.०२.२०२६ रोजी पर्यंत प्राप्त केलेले व वैध असणे आवश्यक आहे.

७) संबंधीत पदासाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करीत नसल्याचे किंवा नेमणूकीसाठी आवश्यक असलेल्या अटींची किंवा जाहिरातीमधील कोणत्याही अटीचा व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधीत उमेदवाराचा पुढील भरती प्रक्रियेसाठी विचार करण्यात येणार नाही / उमेदवाराची निवड कोणत्याही टप्प्यावर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

८) जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे उमेदवारांजवळ असलेली सर्व आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे (शैक्षणिक अर्हता वगळून) ही जाहिरातीस अनुसरुन संबंधीत रिक्त पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी (दि.०८.०४.२०२५) प्राप्त केलेली असणे व कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेच्या दिवशी वैध असणे आवश्यक आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ज्या उमेदवारांजवळ आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे ही कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेली नसतील व कागदपत्रे जमा करण्याच्या दिवशी वैध नसतील अशा उमेदवारांची उमेदवारी ताबडतोब रद्द करण्यात येईल व सदर प्रकरणी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल महानिर्मिती कंपनीतर्फे घेण्यात येणार नाही. तसेच उमेदवाराने, जाहिरातीत नमूद शैक्षणिक अर्हता व अनुभव हे जाहिरातीस अनुसरुन संबंधीत पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत धारण करीत असणे आवश्यक आहे.

९) माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालय यांच्याकडे नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदरचे आरक्षण हे केवळ माजी सैनिकांनाच लागू असून त्यांच्या वारसांना या आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही, याची नोंद घ्यावी. माजी सैनिकांकडे सेवेतून कार्यमुक्त करण्यात आल्याचे कार्यमुक्त प्रमाणपत्र (Discharge Certificate) जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले म्हणजेच (दि.०८.०४.२०२५) रोजी पर्यंत वैध असलेले अथवा सध्याच्या कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी म्हणजेच दि.१८.०२.२०२६ रोजी पर्यंत प्राप्त केलेले व वैध असणे आवश्यक आहे. तसेच माजी सैनिक उमेदवारांनी यापूर्वी सदरील आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास, त्यांना पुन:श्च सदरील आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय नसेल, याची विशेष नोंद घ्यावी. याविषयी चुकीची / खोटी माहिती सादर केल्याचे आढळून आल्यास उमेदवारी / नियुक्ती तत्काळ रद्द करण्यात येईल.

१०) आदुघ प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी महाराष्ट्र शासन निर्णय दि.१२.०२.२०१९ तसेच त्यानंतर वेळोवेळी शासनाने पारीत केलेले शासन निर्णय / परिपत्रकांच्या अनुषंगाने मिळकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच सदरील उमेदवारांनी शासन निर्णयात नमूद मिळकतीच्या प्रमाणपत्रात चुकीची / दिशाभूल करणारी माहिती सादर करुन मिळकत प्रमाणपत्र प्राप्त केल्यास, अशा उमेदवारांना भरतीतील कोणत्याही टप्प्यात अपात्र ठरविण्यात येईल व सदरील उमेदवारांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल,याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

११) कागदपत्रे जमा करण्याची पात्रता यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करण्याचा अधिकार महानिर्मिती कंपनी राखून ठेवत आहे.

१२) कागदपत्रे जमा करण्याकरीता उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांनी वाम मार्गाचा अवलंब केल्याचे (जसे राजकीय दबाव, खोटी कागदपत्रे सादर करणे, धमकी देणे व इतर कोणतेही गैरकृत्य) निदर्शनास आल्यास उमेदवाराची निवड ही भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

१३) कागदपत्रे जमा करण्याची पात्रता यादी तयार करताना ऑनलाईन परीक्षेत समान गुण प्राप्त झालेल्या उमेदवारांना बोलविण्यात आले आहे. तथापि, अशा उमेदवारांच्या अंतिम निवड यादीत समावेश करताना शासन नियमानुसार जन्मतारखेनुसार जेष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१४) कागदपत्रे जमा करण्याच्या पात्रता यादीत नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक देण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही. ही यादी पूर्णत: जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता आणि इतर अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहून तयार करण्यात आलेली आहे.

१५) कागदपत्रे जमा करण्याच्या दिवशी जे उमेदवार विहीत केलेल्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करणार नाहीत त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व कोणत्याही प्रकारचे निवेदन अथवा विनंती अर्जाचा विचार केला जाणार नाही, याबाबतची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१६) अयशस्वी उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार महानिर्मिती कंपनीकडे करु नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची महानिर्मिती कंपनीकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१७) कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) या पदाच्या कागदपत्रे जमा करण्याच्या पात्रता यादीत समावेश असलेल्या उमेदवारांनी जाहिरातीत नमूद आवश्यक उंची आणि वजन नमूद केलेले, नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाकडून (Registered Medical Practitioners) प्रमाणित केलेले प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. यासंदर्भात कोणतीही चुकीची माहिती आढळल्यास, उमेदवारास अपात्र ठरवले जाईल.

१८) महानिर्मिती प्रशासकीय परिपत्रक क्र.५०२ दि.१७.०८.२०२२ नुसार सरळसेवा प्रवेशाव्दारे प्रसिध्द करण्यात येणाऱ्या पदांकरीता मागास प्रवर्गातून (Backward Class) अंतिम निवडी करीता एकूण गुणांपैकी किमान २०% गुण व खुल्या प्रवर्गातून (Open Category) अंतिम निवडीकरीता एकूण गुणांपैकी किमान ३०% गुण मिळविणे आवश्यक आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१९) कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) या पदाकरीता वर नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेनंतर, एखाद्या प्रवर्गातून १:२ या प्रमाणात पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अतिरिक्त उमेदवार बोलविण्याचे / सदरील पद पुर्न: जाहिरात करण्याचे संपूर्ण अधिकार महानिर्मिती कंपनी राखून ठेवत आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२०) कागदपत्रे जमा करण्याकरिता उपस्थित राहताना उमेदवारांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे भरलेल्या अर्जाची मुळ प्रत, त्यांची मूळ (Original) कागदपत्रे तसेच कागदपत्रांचा स्वसाक्षांकित (Self Attested) केलेला एक छायांकित संच (One Zerox copy set) स्वत:जवळ बाळगावा. तसेच आवश्यक सर्व कागदपत्रे घेऊनच उमेदवाराने कागदपत्रे जमा करण्याकरीता खाली नमूद ठिकाणी, दिवशी व वेळेवर उपस्थित राहावे. विहीत नमूद दिनांक व वेळेवर कागदपत्रे जमा करण्याकरीता उपस्थित न राहणाऱ्या उमेदवारांची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

२१) कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) या पदाकरीता दि.१८.०२.२०२६ व दि.१९.०२.२०२६ रोजी कागदपत्रे पडताळणीकरीता, ती जमा करण्याच्या प्रक्रियेसाठी, उमेदवारांना उपस्थित राहावयाचे स्थळ व वेळ खालीलप्रमाणे :-

| दिनांक | वेळ | उपस्थित राहण्याचे ठिकाण |
|---|---|---|
| दि.१८.०२.२०२६ व दि.१९.०२.२०२६ | **सकाळी ०९.३०** | महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, एस्ट्रेला बॅटरीज एक्सपॅन्शन इमारत, पहिला मजला, लेबर कॅम्प,धारावी रोड, मांटुगा (पूर्व), मुंबई-४०००१९. |

**"कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) या पदाच्या कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता तुकडीनिहाय यादी प्राप्त करण्याकरीता येथे क्लिक करावे"** ↵

(डॉ.नितीन वाघ)
कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती